DLSA Nashik

सत्यमेव जयते

District Mediation Monitoring Committee Nashik

# DISTRICT LEGAL SERVICES AUTHORITY, NASHIK

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक


**विधी सेवा सदन, जिल्हा व सत्र न्यायालय परिसर,**
**नाशिक – ४२२००१**

8591903615. ☎ (0253)2314306
dlsa.nashik@bhc.gov.in


जावक क्र./जीविसेप्राना/ १२९६ /२०२६,
दिनांक: १६ मे २०२६

## वाहानचालक संवर्गातील एक पद करार पद्धतीने भरणेबाबत जाहिरात

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक कार्यालयाकरीता वाहन चालक (Driver) संवर्गातील **एक (०१) रिक्त पद** हे **करार पद्धतीने ११ (अकरा) महिन्यांच्या कालावधीसाठी** भरण्यात येणार आहे. सदर पदाकरिता पात्र व इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह **सीलबंद लिफाफ्यात** जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून **०७ (सात) दिवसांच्या आत** खाली नमूद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

## पदांचा तपशील

| अनु. क्र. | पदनाम | रिक्त पद संख्या | भरती पद्धत | कालावधी | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाहानचालक (तात्पुरत्या स्वरूपाचे) | ०१ | करार पद्धत | ११ महिने | १५,५३२/- |

**शैक्षणिक व इतर पात्रता**

१. उमेदवार किमान १० वी उत्तीर्ण असावा.
२. उमेदवाराकडे वैध मोटार वाहन / LMV ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक आहे.
३. वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असावा.
४. उमेदवार शारीरिकदृष्ट्या सक्षम व सुदृढ असावा.
५. वाहन देखभाल व प्राथमिक दुरुस्तीची माहिती असल्यास प्राधान्य दिले जाईल.

**वयोमर्यादा**

१. अर्जाच्या अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय १८ ते ३८ वर्षे असावे.
२. शासन नियमानुसार राखीव प्रवर्गास वयोमर्यादेत सवलत लागू राहील.

**आवश्यक कागदपत्रे**

१. अर्जाचा विहित नमुना
२. जन्मतारीख पुरावा / शाळा सोडल्याचा दाखला
३. शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे
४. वैध ड्रायव्हिंग लायसन्स प्रत
५. अनुभव प्रमाणपत्र
६. आधार कार्ड / इतर ओळखपत्र
७. रहिवासी दाखला

८. पासपोर्ट आकाराचे दोन अलीकडील फोटो
९. जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)
१०. **पोलीस पडताळणी प्रमाणपत्र**
११. **चारित्र्य प्रमाणपत्र** (गॅझेटेड अधिकारी / सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले)

**निवड प्रक्रिया**

१. अर्जांची छाननी करण्यात येईल.
२. पात्र उमेदवारांना वाहन चालविण्याची चाचणी व मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.
३. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

**अटी व शर्ती**

1. सदर नियुक्ती पूर्णतः तात्पुरती व करार पद्धतीवरील असेल.

२. नियुक्त उमेदवारास शासन सेवकाचा दर्जा प्राप्त होणार नाही.

३. करार कालावधी संपल्यानंतर नियुक्ती आपोआप समाप्त होईल.

४. निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीपूर्वी **पोलीस पडताळणी अहवाल समाधानकारक** सादर करणे आवश्यक राहील.

५. उमेदवाराने **चारित्र्य प्रमाणपत्र** सादर करणे बंधनकारक राहील.

६. उमेदवाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल / प्रलंबित असल्यास उमेदवारी रद्द करण्यात येऊ शकते.

७. नियुक्त झालेल्या वाहनचालकाच्या चारित्र्याबाबत, वर्तणुकीबाबत अथवा त्याच्याविरुद्ध कोणतीही प्रतिकूल बाब

आढळून आल्यास तसेच सेवेत कसूर, निष्काळजीपणा, गैरवर्तन किंवा कर्तव्यात त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास, कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची सेवा तत्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत या प्राधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

८. अपूर्ण / चुकीची माहिती असलेले अर्ज नामंजूर करण्यात येतील.

९. प्राधिकरणास जाहिरात रद्द / बदल / स्थगित करण्याचा अधिकार राहील.

**अर्ज सादर करण्याचा पत्ता**

**सचिव,**
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक
**विधी सेवा सदन,**
**जिल्हा व सत्र न्यायालय परिसर,**
**नाशिक – ४२२००१**

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

दिनांक :१६ मे २०२६
ठिकाण : नाशिक

DISTRICT LEGAL SERVICES AUTHORITY
सत्यमेव जयते
NASHIK

16/5/2026

**(सचिव)**
**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक.**